महाराष्ट्र लोकसेवा आयोग व राज्य प्रादेशिक निवड मंडळ अपुरस्कृत कर्मचा-यांच्या बाबतीत परीक्षेसाठी कालावधी मोजताना विचारात घ्यावयाचा नियुक्तीचा दिनांक

२८

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक परीक्षा-1089/प्र.10/89/17,**
**मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 1 डिसेंबर 1992.**

**संदर्भ:-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक परीक्षा-1089/प्र.10/89/17, दिनांक 23 जानेवारी 1990.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक परीक्षा-1089/प्र.10/89/17, दिनांक 23 जानेवारी 1990 अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :-

"परीक्षेसाठीचा कालावधी मोजताना महाराष्ट्र लोकसेवा आयोग अपुरस्कृत कर्मचारी तसेच राज्य/प्रादेशिक निवड मंडळ अपुरस्कृत कर्मचा-यांच्या बाबतीत जो दिनांक विचारात घ्यावयाचा तो दिनांक म्हणजे त्यांची नेमणूक प्रत्यक्षात नियमित केल्याचे आदेश ज्या दिनांकास निर्गमित झाले असतील तो आदेशाचा दिनांक विचारात घ्यावा."

2. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अपुरस्कृत कर्मचा-यांच्या बाबतीत परीक्षेस बसण्यासाठी अर्हता कालावधी मोजताना सेवा नियमित करण्यासंबंधातील आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित केल्याचा दिनांक धरावा की, सेवा नियमित करण्याबाबत संबंधित मंत्रालयीन विभागांनी/शासकीय कार्यालयांनी त्यांच्या विभागातील/कार्यालयातील कर्मचा-यांचे सेवा नियमित केल्याचे आदेश निर्गमित केल्याचा दिनांक धरावा असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. याबाबत असे स्पष्टीकरण करण्यात येत आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोग अपुरस्कृत कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्या सेवा नियमित करण्यासंबंधातील आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून ज्या दिनांकास निर्गमित झाले असतील तो दिनांक परीक्षेस बसण्यासाठी अर्हता कालावधी मोजण्यासाठी विचारात घ्यावा.

वरील स्पष्टीकरणानंतर संबंधित संवर्गाच्या परीक्षा नियमांत बदल अपेक्षित नसल्याने दिनांक 23 जानेवारी 1990 च्या शासन निर्णयातील शेवटचा परिच्छेद वगळण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

(कृ.मा.प.)

शामनु-येरा-साप्रवि-एच-742(4,500-12-91)

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
× सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
× प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
× प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
× प्रबंधक, लोकआयुक्त, उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभाग/का.12,16-ब,20,20-अ,28 व 34,
निवड नस्ती.

२६